**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.१२८२/२०२५**
**सरकार वि. केशव केवळसिंग पवार**
**CNR No.MHYA050021792025**

# <u>न्यायनिर्णय</u>

**<u>(घोषित दिनांक ०६.०७.२०२६)</u>**

न्यायालयाचे विचाराधीन निघालेले मुद्दे व त्यावरील निष्कर्ष खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने सिद्ध केले काय की, दिनांक १२.०४.२०२५ रोजी दुपारी १३.०० वाजता मौजे हौसापुर उडदी ता.पुसद येथे आरोपीच्या राहत्या घरी आरोपी विना परवाना एका प्लॅस्टीक डबकीत १० लिटर गावठी हातभटटी दारु एकूण किंमत अंदाजे १०००/— किंमतीची दारु गैरकायदा कब्जात बाळगतांना मिळून आले व त्याद्वारे आरोपीने मुंबई दारु बंदी कायदा कलम ६५—ई प्रमाणे गुन्हा केला ? | **नकारार्थी.** |
| २. | काय आदेश? | **आरोपीस निर्दोष मुक्त केले.** |

## <u>कारणमिमांसा</u>

२. आरोपीविरुद्ध गुन्हा सिद्ध करण्यास्तव अभियोग पक्षाने केवळ एक साक्षीदार तपासला आहे. **साक्षीदार क्रमांक—१ राजुसिंग मदन राठोड** यांची साक्ष ***<u>निशाणी क्रमांक—०६</u>*** वर नोंदविण्यात आली.

**<u>मुद्दा क्र. १ साठी:</u>**

३. **साक्षीदार क्रमांक—१ राजुसिंग मदन राठोड** यास पोलीसाने त्याला रस्त्यात थांबवुन एका कागदावर सही करण्यासाठी बोलविले असल्याचे सांगीतले. साक्षीदाराला पंचनाम्यावरील सही दाखविले असता त्याने अनुक्रमांक २ वर सही असल्याचे सांगीतले. परंतु त्यातील मजकुर माहिती नसल्याचे त्यांनी कथन केल्याने त्याला भारतीय साक्ष अधिनियम कलम १५७ नुसार तपासण्यात आले. परंतु

अभियोगपक्षास मदत होईल असे काहीही त्यांच्या पुराव्यात आले नाही. तथापी पंच साक्षीदाराने पोलीसांनी त्याला तो रस्त्यावर असताना त्याला थांबवुन सही करण्यास सांगितले असल्याचे कथन केल्याने सदर पंचनामा संशयाच्या पलीकडे सिध्द झाल्याचे म्हणता येत नाही. त्यामुळे त्यांचा पुरावा अभियोगपक्षास उपयुक्त ठरत नाही.

४. अभियोगपक्षास पुरेशी संधी देवून देखील अभियोगपक्षाने साक्षीदार पुराव्याकामी हजर केलेले नाही. त्यामुळे तपासी अधिकारी यांनी आरोपीने गावठी हातभट्टी दारु विना परवाना चोरटी विक्री केली ही बाब संशयापलिकडे सिद्ध करु शकला नाही. तसेच जप्त केलेल्या द्रव्याबाबत वैज्ञानिक परिक्षणाचा अहवाल दाखल केलेला असला तरी सदर द्रव्य हे आरोपीच्या ताब्यातुन जप्त केले होते आणि तेच द्रव्य रासायनिक विश्लेषणासाठी त्याच्यामध्ये कोणताही फेरफार न होता तत्परतेने पाठविण्यात आले होते ही बाब सिद्ध झाली नाही. आरोपीच्या ताब्यातून गावठी हातभट्टी दारु जप्त करण्यात आल्याचे अभियोगपक्षाच्या आरोपात गावठी हातभट्टी दारु जप्ती सिद्ध न झाल्याने विश्वासहार्यता राहिली नाही. अभियोग पक्ष आरोपीचा गुन्हयाशी संबध आहे हे सिद्ध करु शकले नाही, स्वतंत्र पंच साक्षीदार, ज्याच्यासमोर अभियोगपक्षाचे मते आरोपीचे ताब्यात बेकायदेशीर दारु सापडली, अभियोगपक्षाला मदत करत नाही. त्यामुळे, माझे मते आरोपीकडून बेकायदेशीर गावठी हातभट्टी दारु जप्त केल्याचे सिद्ध होऊ शकत नाही. म्हणुन आरोपी दोषमुक्त होण्यास पात्र आहे. सबब मुद्दा क्रमांक—१ चे उत्तर मी नकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्रमांक २ करीता</u> :**

५. जप्त मुद्देमाल हा जागीच नाश करण्यात आल्याने त्यासंदर्भात कोणताही आदेश पारीत करण्यात येत नाही.

६. अभियोगपक्षाच्या खटल्यामध्ये ब—याच उणीवा आहेत. अभियोगपक्ष हा आरोपीविरुद्ध पुरेसा, पुरक व पुष्टी देणारा पुरावा सादर करु शकला नाही. म्हणून आरोपी हा शंकेचा फायदा मिळण्यास पात्र आहेत. सबब मी **मुद्दा क्रमांक २** चे उत्तरादाखल खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

**१.** आरोपी **केशव केवळसिंग पवार,** रा. हौसापुर उडदी, ता.पुसद जि.यवतमाळ यांची कलम ६५(ई) महाराष्ट्र दारुबंदी कायदा या अपराधातुन भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम—२७८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

**२.** आरोपीचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येत आहे व त्यातून त्यांना मुक्त करण्यात येत आहे.

**३.** भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ४८१ अन्वये आरोपीने जामीनाबाबत पुर्तता करावी.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला).**

**स्वा/—**

**(अमिता यु. यादव)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
पुसद (न्यायालय क्र.०४)

दिनांक ०६/०७/२०२६.